
महावितरण
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्या., नाशिक परिमंडळ, नाशिक
"माझे उपकेंद्र, स्वच्छ उपकेंद्र, सुरक्षित उपकेंद्र"
PERFECT CLICK PHOTOGRAPHY
पारितोषिक वितरण सोहळा
अध्यक्ष : मा.श्री.ब्रिजपालसिंह जनवीर
मुख्य अभियंता-नाशिक परिमंडळ, नाशिक
- प्रमुख उपस्थिती -
मा.श्री.प्रविण दरोली
मा.श्री.संतोष सांगळे
अहमदनगर
मा.रमेश सानप
अधिक्षक अभियंता-मालेगांव मंडळ,
मालेगांव
डिसेंबर
स्थळ :

महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ,श्रीरामपूर ग्रामीण विभाग,

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

दूरध्वनी-०२४२२-२२१३७३

०२४२२-२२११७५

फॅक्स-०२४२२-२२११७५

कार्यकारी अभियंता

हिरा भवन, रेल्वे स्टेशन जवळ

श्रीरामपूर, जि. अहमदनगर

जा.क्र. का.अ/श्रीरामपूर/२०१९-२०/तांत्रिक/गाळणी कक्ष/१२५७ — दि. १५/०५/२०१९

प्रति,

मा. अधिक्षक अभियंता,

पायाभूत आराखडा, नाशिक मंडळ

विषय - "माझे उपकेंद्र स्वच्छ उपकेंद्र सुरक्षित उपकेंद्र" या स्पर्धेत भाग घेणे संदर्भात.

संदर्भ - १) मुअ/नाप/औसंवि/१५६४ दि. १३/०५/२०१९

२) SE/Infra/Nashik/६६६ दि. १०/०४/२०१९

३) मा. श्री. एस. एम. पाटील साहेब, नाशिक मंडळ यांच्याशी झालेली चर्चा.

संदर्भ क्र. (१) व (२) नुसार "माझे उपकेंद्र स्वच्छ उपकेंद्र सुरक्षित उपकेंद्र" ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. आमच्या गाळणी कक्ष, श्रीरामपूर या कार्यालयात देखील वेगवेगळे उपक्रम राबवून तसेच स्क्रॅप मटेरीअलचा पुनर्वापर करून 'टाकाऊ पासून टिकाऊ' हि संकल्पना वापरून दैनंदिन वापरात येणारी उपकरणे, साधने तयार केले आहेत. अनेक छोट्या छोट्या चांगल्या उपक्रमाचे/ गोष्टींचे नियोजन करून त्यांची अंमलबजावणी केलेली आहे. उद्देश फक्त एकच कि, "याच छोट्या छोट्या गोष्टींमधून गाळणी कक्षाची म्हणजेच पर्यायाने महावितरण कंपनीची कार्यक्षमता वाढविणे" हा आहे.

संदर्भ क्र. (३) नुसार श्री. एस. एम. पाटील साहेब यांच्याशी झालेला फोनवरील चर्चेवरून आपल्या परवानगीने गाळणी कक्षास देखील या स्पर्धेत उतरण्याची परवानगी मिळाली आहे. त्या अनुषंगाने गाळणी कक्षात केलेल्या कामाचा आढावा पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून या पत्रासोबत जोडत आहे.

आपल्या माहितीसाठी सविनय सादर.

सहाय्यक अभियंता (गाळणी कक्ष)

महावितरण, श्रीरामपूर विभाग

सोबत-

१) गाळणी कक्षात केलेल्या कामाचे पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन

Received Dt. 15/05/19
Infra Circle, Nashik

प्रत सविनय सादर-

१) मा. अधिक्षक अभियंता, महावितरण, अहमदनगर मंडळ

२) मा. कार्यकारी अभियंता, महावितरण, श्रीरामपूर विभाग

**सादरकर्ते**

# “गाळणी कक्ष”

## महावितरण, श्रीरामपूर विभाग,
## अहमदनगर मंडळ, नासिक परिमंडळ

मार्गदर्शक- मा. श्री. शरद किसन बंड साहेब,
कार्यकारी अभियंता, महावितरण,
श्रीरामपूर विभाग

**संपर्क**

श्री. सुजय रामचंद्र उपाध्ये, सहाय्यक अभियंता (गाळणी कक्ष)
मोबाईल- ७८७५७६६३४० Email- filtershrirampur@gmail.com

# गाळणी कक्षाचा नवीन तयार केलेला बोर्ड



# चालू/ फेल ट्रांसफॉर्मरचे गाळणी कक्षात लोडिंग अनलोडिंग करण्यासाठी तयार केलेली ट्रॉली

गाळणी कक्षातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने, उपलब्ध पण वापरात नसलेले मटेरीअल तसेच स्क्रॅप मटेरीअल वापरून चालू/ फेल ट्रांसफॉर्मरचे गाळणी कक्षात लोडिंग अनलोडिंग करण्यासाठी ट्रॉली तयार केलेली आहे. या ट्रॉलीमुळे महावितरणच्या व कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने खालील फायदे आहेत.

- ✓ ट्रांसफॉर्मर लोडिंग अनलोडिंग करतांना कामगारांचे श्रम वाचतात.
- ✓ ट्रांसफॉर्मर लोडिंग अनलोडिंग करतांना कामगारांना होणाऱ्या दुखापतींची शक्यता कमी झाली आहे.
- ✓ ट्रांसफॉर्मर लोडिंग अनलोडिंगचे काम निटनेटके व सुटसुटीत झाले आहे.
- ✓ ट्रांसफॉर्मर लोडिंग अनलोडिंग कमी वेळात होते.
- ✓ गाळणी कक्षात ट्रांसफॉर्मर लोडिंग अनलोडिंगसाठी होणारा खर्च वाचणार आहे.
- ✓ ट्रांसफॉर्मर त्यांच्या कॅटॅगरीनुसार नेटकेपणाने विभागून ठेवता येतात.
- ✓ ट्रांसफॉर्मर रिपेअर करण्यासाठी टॉप प्लेट उघडून रिपेअरिंग करणे अधिक सोपे व सोयीस्कर झाले आहे.

# लोडिंग अनलोडिंग ट्रॉली



# लोडिंग अनलोडिंग ट्रॉली तयार करण्यापूर्वी



# लोडिंग अनलोडिंग ट्रॉली तयार झाल्यानंतर



# लोडिंग अनलोडिंग ट्रॉली तयार झाल्यानंतर



# कर्मचाऱ्यांना कायझेन व फाईव्ह एस या जपानी संकल्पनांचे प्रशिक्षण

गाळणी कक्षातील कर्मचाऱ्यांना कायझेन व फाईव्ह एस या जपानी संकल्पनांचे प्रशिक्षण दिले. यामध्ये कोणत्याही प्रकारची आर्थिक गुंतवणूक न करता आपण आपल्या कामामध्ये अद्वितीय आणि अनपेक्षित परिणाम साध्य करू शकतो. या पायऱ्यांच्या आधारे आपण 'टोटल क्वालिटी मॅनेजमेंट' हे लक्ष साध्य करू शकतो. अशा प्रकारच्या या संकल्पना आहेत.





# शेतकरी व महावितरणमध्ये होणारे गैरसमज दूर करण्यासाठी विशेष ग्रामसभा

ग्राहकांसाठी- ट्रांसफॉर्मर नादुरुस्त होऊ नये किंवा झाला तर काय काळजी घ्यावी? यासाठी मौजे वडाळा महादेव व फत्याबाद, तालुका- श्रीरामपूर, जिल्हा- अहमदनगर येथे मार्गदर्शनपर कार्यशाळा तथा ग्रामसभा आयोजित केली. त्यात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांचे प्रबोधन करण्यात आले. त्यामुळे शेतकरी व महावितरणमध्ये होणारे गैरसमज दूर होतील. या कार्यशाळा तथा ग्रामसभेसाठी त्या- त्या गावातील नागरिकांना भेटून, विषयाचे महत्व पटवून देत, गावातील नेते मंडळीना सोबत घेऊन सर्व नियोजन केले. सर्व स्तरावरून मिळालेल्या सहकार्यामुळे वरील दोन्ही सभा यशस्वी झाल्या.





# महावितरणकडून वीज वापरासंबंधी कार्यशाळा उत्साहात

**पुण्यनगरी वृत्तसंस्था / श्रीरामपूर**

महावितरण कंपनीच्या वतीने तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी 'विद्युत मोटार व रोहित्र यांची देखभाल व दुरुस्ती' या विषयावर नुकतीच कार्यशाळा घेण्यात आली. वारंवार रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण वाढल्याने घ्यावयाच्या काळजीसंबंधी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

तालुक्यातील वडाळा महादेव व फत्याबाद येथे या कार्यशाळा पार पडल्या. महावितरणचे कार्यकारी अभियंता शरद बंड, सहायक अभियंता सुजय उपाध्ये, तांत्रिक कर्मचारी रावसाहेब बेंद्रे, काशिनाथ वायाळ, देवीदास मेंगळे, सुनील पवार आदी यावेळी उपस्थित होते. ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

ऐन हंगामामध्ये रोहित्र जळण्याचे व विद्युत मोटारीत बिघाड होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यातून शेतकरी व महावितरणमध्ये गैरसमज निर्माण होतात. त्या पार्श्वभूमीवर प्रबोधन करण्यात आले. शेतकऱ्यांनी विद्युत मोटारींना कॅपॅसिटर बसवावेत. त्यामळे अचानकपणे रोहित्रावरून अधिकची वीज खेचण्याचे प्रमाण कमी होईल, असे आवाहन अधिकाऱ्यांनी केले.

स्वयंचलित स्टार्टर बसवू नयेत, तसेच फ्युज तसेच वायर वापरताना काळजी घ्यावी. दुरुस्त झालेले रोहित्र बसविण्यापूर्वी शेतकऱ्यांनी आपापल्या मोटारींची तपासणी करून घ्यावी. मोटारींच्या देखभाल दुरुस्तीकडे वेळोवेळी लक्ष द्यावे, अशा सूचना करण्यात येऊन वीज चोरी थांबवून सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले.



वडाळा महादेव : 'विद्युत मोटार व रोहित्र यांची देखभाल व दुरुस्ती' या विषयावर आयोजित कार्यशाळेत बोलताना महावितरणचे अधिकारी.

# महावितरणकडून वीज वापरासंबंधी कार्यशाळा

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

महावितरण कंपनीच्या वतीने तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी विद्युत मोटार व रोहित्र यांची देखभाल व दुरूस्ती या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. वारंवार रोहित्र नादुरूस्तीचे प्रमाण वाढल्याने घ्यावयाच्या काळजीसंबंधी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

तालुक्यातील वडाळा महादेव व फत्याबाद येथे ही कार्यशाळा पार पडली. महावितरणचे कार्यकारी अभियंता शरद बंड, सहायक अभियंता सुजय उपाध्ये, तांत्रिक कर्मचारी रावसाहेब बेंद्रे, काशिनाथ वायाळ, देविदास मेंगळे, सुनील पवार आदी यावेळी उपस्थित होते. ग्रामस्थ व शेतकजयांनी त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

ऐन हंगामामध्ये रोहित्र जळण्याचे व विद्युत मोटारीत बिघाड होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यातून शेतकरी व महावितरणमध्ये गैरसमज निर्माण होतात. त्या पार्श्वभूमीवर प्रबोधन करण्यात आले. शेतकऱ्यांनी विद्युत मोटारींना कॅपॅसिटर बसवावेत. त्यामुळे अचानकपणे रोहित्रावरून अधिकची वीज खेचण्याचे प्रमाण कमी होईल, असे आवाहन अधिकाऱ्यांनी केले.

स्वयंचलित स्टार्टर बसवू नयेत, असेही सांगण्यात आले.

# महावितरणकडून वीज वापरासंबंधी कार्यशाळा

## शेतकऱ्यांना मार्गदर्शन : ग्राहक अधिकाऱ्यांत थेट संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क


**श्रीरामपूर** : महावितरण कंपनीच्या वतीने तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी विद्युत मोटार व रोहित्र यांची देखभाल व दुरूस्ती या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. वारंवार रोहित्र नादुरूस्तीचे प्रमाण वाढल्याने घ्यावयाच्या काळजीसंबंधी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

वडाळा महादेव व फत्याबाद येथे शुक्रवारी ही कार्यशाळा पार पडली. महावितरणचे कार्यकारी अभियंता शरद बंड, सहायक अभियंता सुजय उपाध्ये, तांत्रिक कर्मचारी रावसाहेब बेंद्रे, काशिनाथ वायाळ, देवीदास मेंगळे, सुनील पवार उपस्थित होते. ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

ऐन हंगामामध्ये रोहित्र जळण्या… व विद्युत मोटारीत बिघाड होण्या… प्रमाण वाढत आहे. त्यातून शेतक… महावितरणमध्ये गैरसमज नि… होतात. त्या पार्श्वभूमीवर प्रबो… करण्यात आले. शेतकऱ्यांनी वि… मोटारींना कॅपॅसिटर बसवावेत. त्या… अचानकपणे रोहित्रावरून अधि… वीज खेचण्याचे प्रमाण कमी हो… असे आवाहन अधिकाऱ्यांनी केले.

स्वयंचलित स्टार्टर बसवू न… तसेच फ्युज तसेच वायर वाप… काळजी घ्यावी. दुरुस्त रोहि… बसविण्यापूर्वी शेतक… आपापल्या मोटारींची तपासणी क… घ्यावी. मोटारींच्या देख… दुरूस्तीकडे वेळोवेळी लक्ष द्यावे, … सूचना देण्यात आली. वीज … थांबवून सहकार्य करावे, अ… आवाहनही करण्यात आले.

# ग्राहक व कर्मचारी वर्गात
# रोहित्र देखभाली संदर्भात जागृतीसाठी



जनमित्रांसाठी महत्वाची सुचना


रिपेअर ट्रान्सफॉर्मर बसविताना घ्यावयाची काळजी

१. ट्रान्सफॉर्मरचे बॉडी अर्थिंग, न्युट्रल अर्थिंग व L.A. अर्थिंग व्यवस्थित असल्याची खात्री करावी.
२. इलेक्ट्रीक मोटारींना योग्य क्षमतेचे कॅपॅसिटर बसविल्याची खात्री करावी.
▲ 3 HP · 2 KVAR ▲ 5 HP: 3 KVAR
▲ 7.5 H.P. : 5 KVAR
३. मोटार वायंडीग बॉडीशी शॉर्ट नाही याची भेगरने खात्री करावी.
४. ऑटो स्टार्टर वापर बंद करावा.
५. मोटर केबल जॉईंट व्यवस्थित इन्शुलेशन टेपने टेपिंग करावे.
६. लुज गाळे टायटनींग करावे. लाइन फॉल्ट असल्यास दुरुस्त करावा.
७. योग्य क्षमतेचे फयुज/डि.ओ. बसवावेत. ट्रान्सफॉर्मर पुन्हा फेल होणार नाही याची काळजी घ्यावी.
८. विजेची चोरी बंद होण्यासाठी ग्राहकांनी महावितरणला सहकार्य करावे.


कार्यकारी अभियंता, महावितरण, श्रीरामपूर

रोहित्र नादुरुस्त होऊ नये किवा नादुरुस्त झाल्यावर ग्राहकांनी व वीज सेवकांनी घ्यावयाची काळजी- या संदर्भातील माहितीपत्रक तयार करून ग्राहक व कर्मचारी वर्गात रोहित्र देखभाली संदर्भात जागृतीसाठी प्रयत्न केले जातात व गाळणी कक्षात आलेल्या ग्राहकांचे प्रबोधन केले जाते.

# गाळणी कक्षातील ट्रान्सफॉर्मर टेस्टिंग पॅनल पुर्वी



# गाळणी कक्षातील ट्रान्सफॉर्मर टेस्टिंग पॅनल सध्या




अनेक वर्षांपासून असलेली नियमबाह्य पद्धतीची व धोकादायक असलेली वायरींग दुरुस्त करून सुरक्षित वायरींग केली.

# सुतगिरणी वसतीगृहातील पाणी पुरवठ्याच्या मोटारचा पॅनल पुर्वी



# सुतगिरणी वसतीगृहातील पाणी पुरवठ्याच्या मोटारचा पॅनल पुर्वी




# सुतगिरणी वसतीगृहातील पाणी पुरवठ्याच्या मोटारचा पॅनल सध्या





# सुतगिरणी वसतीगृहातील पाणी पुरवठ्याच्या मोटारचा पॅनल सध्या



# गाळणी कक्षात दुरुस्त केलेले ट्रांसफॉर्मर

| अ. क्र. | क्षमता | सन २०१६-२०१७ | सन २०१७-२०१८ | सन २०१८-२०१९ |
|---|---|---|---|---|
| १ | ६३ के. व्ही. ए. | १० | ७ | ५ |
| २ | १०० के. व्ही. ए. | ४८ | ३९ | २४ |
| ३ | २०० के. व्ही. ए. | ७ | ८० | ३ |
| | एकूण | ६५ नग | ५४ नग | ३२ नग |

# गाळणी कक्षात ट्रांसफॉर्मर दुरुस्त करताना



# गाळणी कक्षात नव्याने सुरु केलेली डिस्ट्रीब्यूशन ट्रान्सफॉर्मर टेस्टिंगची सुविधा




**शेतकऱ्यांना कॅपॅसिटरचे महत्व पटवून देण्यासाठी तयार केलेला मोटार व कॅपॅसिटरचा पॅनेल. कॅपॅसिटरच्या वापरामुळे पडणारा फरक त्यांना समजावून सांगता येईल.**

**टिप: ह्या पॅनलचे ७० % काम पूर्ण झाले असून ३० % काम बाकी आहे, ते येत्या काही दिवसात पूर्ण होईल.**



# गाळणी कक्षातील नोटीस बोर्ड- पुर्वी



# गाळणी कक्षातील नोटीस बोर्ड- सध्या



# गाळणी कक्षातील स्क्रॅप डिस्ट्रिब्युशन बॉक्स पासून तयार केलेले कपाट





# विभागीय भांडारातील तळमजल्यावरील ठेवण्यात आलेले मटेरीअल खिडकी तुटल्याने ते सुरक्षित नव्हते.



## विभागीय भांडारातील तळमजल्यावरील ठेवण्यात आलेले मटेरीअलच्या सुरक्षिततेसाठी स्क्रॅप पत्र्यापासून केलेली व्यवस्था.



# गाळणी कक्षात तयार केलेले नवीन रजिस्टर

- इन्फ्रा जॉबचे रजिस्टर
- टेस्टिंग रजिस्टर
- मटेरीअल ट्रान्सफर रजिस्टर

# मेडिकल बॉक्स


मेडिकल
+ बॉक्स +


Povidone-Iodine Ointment USP
CIPLADINE
Cipla
20g
Cipladine
Dettol
SAKET
COTTONS PVT. LTD.
AN ISO 9001:2008 CO.
SAKET
COTTONS PVT. LTD.
AN ISO 9001:2008 CO.

# गाळणी कक्षातील स्वच्छता मोहीम

गाळणी कक्षातील सर्व कर्मचाऱ्यांच्या मदतीने गाळणी कक्षाचा घाण व कचरा असलेला सर्व परिसर स्वच्छ करून घेतला आहे. तसेच अस्ताव्यस्त असलेले मटेरीअल व्यवस्थित व नीटनेटके रचून ठेवले आहे.

# गाळणी कक्षातील स्क्रॅप ऑईल बॅरेल पासून तयार केलेली कचरापेटी



गाळणी कक्षातील सर्व कर्मचाऱ्यांच्या मदतीने उपलब्ध व अस्ताव्यस्त असलेले विभागीय भांडाराचे सर्व साहित्य व्यवस्थित निटनेटके व सुटसुटीत रचून, जेणे करून त्यांचे व्यवस्थित मोजमाप (Inventory)करता येईल.









# गाळणी कक्ष परिसर- पूर्वी



# गाळणी कक्ष परिसर- पूर्वी



# गाळणी कक्ष परिसर- सध्या



स्लाईड नंबर ३२, ३३ व ३४ चे फोटो हे एकाच ठिकाणाचे आहेत.

# गाळणी कक्ष परिसर- सध्या



क्युबिकल पॅनेलचे कुंपण करून त्यात इंशुलेटर ठेवले आहेत त्यामुळे ते अस्ताव्यस्त न पसरता एकत्र राहण्यास मदत होते

# गाळणी कक्ष परिसर



## पुर्वी

पुर्वी जी. आय. वायरच्या कॉईल मोजण्यास अडचण येत असे, त्यामुळे १० कॉईलचा एक कॉलम केला, असे केल्याने एकूण कॉईल सहज मोजता येतात.



## सध्या

# विभागीय कर्मचारी वसाहतीत नव्याने सुरु झालेली घंटागाडी



# गाळणी कक्ष परिसरातील वृक्षारोपण व संवर्धन

## मागील १ ते २ वर्षांपूर्वी लावलेली झाडे





# गाळणी कक्ष परिसरातील वृक्षारोपण व संवर्धन

## मागील १ ते २ वर्षांपूर्वी लावलेली झाडे






# गाळणी कक्ष परिसरातील वृक्षारोपण व संवर्धन

## मागील १ ते २ वर्षांपूर्वी लावलेली झाडे



# गाळणी कक्ष परिसरातील वृक्षारोपण व संवर्धन





गाळणी कक्षातील
झाडांना चुना
आणि गेरू यांच्या
सहाय्याने रोग
प्रतिकारक मुलामा
दिला

# गाळणी कक्षात येणाऱ्या ग्राहकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय




गाळणी कक्षात कडक उन्हातून आल्यावर ग्राहकांना व कर्मचारी यांना पिण्याच्या पाण्याची केलेली सोय

# वापरण्याच्या पाण्याची सोय





या टाकीमुळे प्रत्येक वेळेस मोटार चालू करण्याची गरज नाही. याआधी प्रत्येक वेळेस मोटार चालू करून पाणी वापरावे लागत असे, त्यामुळे पाणी आणि वीज दोन्ही वाया जायचे


# गाळणी कक्षात कुत्रे व पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय







# कडक उन्हात गाळणी कक्षातील कुत्रे व पक्षी पिण्याच्या पाण्याचा आनंद घेतांना…





# कडक उन्हात गाळणी कक्षातील कुत्रे व पक्षी पिण्याच्या पाण्याचा आनंद घेतांना...



# रात्री प्रत्येक तासाला वाजविण्यासाठी स्क्रॅप RSJ पोल पासून तयार केलेली घंटा





# गाळणी कक्षात उपलब्ध फायर फायटींग सिस्टीम






# गाळणी कक्षाच्या परिसराचे सुशोभीकरण






# दि. १ मे २०१९, कामगार दिनानिमित्त गाळणी कक्षात रक्तदान शिबिराचे आयोजन

**एकूण २५ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग**



# गाळणी कक्षाचे पुढील ध्येय

- **‘माझे महावितरण, माझी सामाजिक बांधिलकी’** हा उपक्रम राबविणे
- गाळणी कक्षातील उर्वरित भाग स्वच्छ करणे
- गाळणी कक्षात आय. एस. ओ. नामांकन मिळविणे.

# ‘माझे महावितरण,
# माझी सामाजिक बांधिलकी’

## संकल्पना

मौजे वडाळा महादेव येथील ग्रामसभेत महावितरणच्या लाईन विषयी काही तक्रारी समोर आल्या होत्या. त्या तक्रारींच्या निराकरणासाठी आपल्या मार्गदर्शनाखाली मौजे वडाळा महादेव येथे **‘माझे महावितरण, माझी सामाजिक बांधिलकी’** हा उपक्रम राबविण्याचे योजिले आहे.

हा उपक्रम राबविल्याने ग्राहकांना नक्कीच चांगल्या प्रतीची सेवा देता येईल व ग्राहकांमध्ये महावितरण कंपनीची प्रतिमा उंचावेल तसेच आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये देखील आत्मविश्वास वाढेल.

त्याची थोडक्यात रूपरेषा खालील प्रमाणे आहे.

# ‘माझे महावितरण,
# माझी सामाजिक बांधिलकी’

## उपक्रमाची रूपरेषा

टाकळीभान कक्ष कार्यालयातील कक्ष अधिकारी आणि सर्व महावितरण व आऊट सोर्सिंगचे कर्मचारी यांच्या सोबत जावून तीन ते चार दिवस मौजे वडाळा महादेव गावातील गावठाण हद्दीतील तसेच अत्यंत धोकादायक अशा ठिकाणांचे खालील कामे पूर्ण करणे.

- सर्व एल.टी व एच.टी लाईनवरील झाडे- वेली तोडणे.
- सर्व लूज गाळे टाईट करणे.
- कंडक्टरला स्पेसर बसविणे.
- वाकलेले पोल सरळ करणे.
- रोड क्रॉसिंगच्या ठिकाणी गार्डींग करणे.
- गरज असल्यास रोड क्रॉसिंग लाईनची हाईट वाढविणे.
- रोहित्रांना अर्थिंग मिळत नसेल तर तेथे अर्थिंग करणे.
- रोहित्रांना गडाख फ्युज बसविणे.
- रोहित्रांवरील लूज कनेक्शन असल्यास ते दुरुस्त करणे.
- इतर महत्वाच्या देखभाल व दुरुस्तीची कामे करणे.

# धन्यवाद !